आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण गरजेचे : डॉ. देशमुख

## के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन



✦ नाशिक । शैक्षणिक संस्थांनी आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन स्वीकारण्यासाठी शाश्वत नवप्रणालीचा दृष्टीकोन स्वीकारणे, ब्लॉकचेन, आयओटी आणि रोबोटिक्ससारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे एकत्रिकरण करणे गरजेचे आहे. दीर्घकालीन मूल्य निर्माण करण्यासाठी व शाश्वत भविष्यासाठी परिवर्तनात्मक बदल घडवणे. शाश्वत विकासाची उद्दिष्टे तसेच सह संशोधन आणि अध्यापनाचे महत्त्व अधोरेखित करण्याचे आवाहन आयआयटी दिल्लीचे प्रा. डॉ. एस. जी. देशमुख यांनी केले.

के. के. अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालय,नाशिक यांच्या वतीने सोमवारी (दि.६) व मंगळवारी (दि.७) शाश्वत भविष्यासाठी अभियांत्रिकी नवकल्पना या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

परिषदेचे उद्घाटन प्रा. डॉ. एस. जी. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ईपिरॉक प्रा. लि च्या जनरल मॅनेजर कॅथरीना कोलकींग, संस्थेचे अध्यक्ष मा समीर बाळासाहेब वाघ, विश्वस्त अशोक मर्चंट, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य प्रा.डॉ. के. एन. नांदूरकर व विविध संस्थेचे प्राचार्य, विभागप्रमुख आणि कर्मचारी उपस्थित होते. या परिषदेत शाश्वत अभियांत्रिकीतील उपाययोजना, शेती व्यवसायातील आर्टीफिसिअल इंटेलिजन्स आणि आयओटी प्रणालीच्या नाविन्यपूर्ण वापराच्या संधी तसेच ऊर्जेतील नवकल्पना यासारख्या विषयांवर ९ समांतर सत्रांमध्ये संशोधक, शिक्षणतज्ज्ञ आणि उद्योग व्यावसायिक यांनी १०० शोधनिबंध सादर केले.

ईपिरॉक प्रा. लि व के.के. वाघ शिक्षण संस्था यांच्या संयुक्त प्रयत्नातून नाविन्यपूर्ण उपक्रम आणि विविध संधी उपलब्ध होऊ शकतात असे प्रतिपादन ईपिरॉक प्रा. लि च्या जनरल मॅनेजर कॅथरीना कोल्किंग यांनी केले.

मंगळवारी शाश्वत भविष्यासाठी अभियांत्रिकी नवकल्पना सशक्तीकरण या विषयावर श्रीलंका शिक्षण मंत्रालयाचे प्रकल्प संचालक डॉ. ललिथ लियानगे, यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले. या आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप ऋषभ ग्रुप आणि ल्युमेल ग्रुपचे सीईओ दिनेश मुसळेकर व संस्थेचे विश्वस्त अशोक मर्चंट यांच्या उपस्थितीत पार पडला.

प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी सामाजिक कारणासाठी विविध उद्योग व के. के. वाघ संस्था यांच्या परस्परसंवादाची भूमिका आणि शाश्वत विकास व चळवळीच्या संधी मांडल्या. प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. डॉ. पद्माकर पवार व प्रा. डॉ. रवींद्र मुंजे कार्यक्रम समन्वयक म्हणून कामकाज पाहिले.